# पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग
# कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी

जा.क्र.कृमविद्रा/पशुदुग्ध/556 /२०२२ दिनांक:-०७/१०/२०२२

## जाहीर नोटीस

कृषि महाविदयालय, दापोलीच्या पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग कृषि महाविद्यालय आस्थापना, मुख्य योजना (Establishment of Agriculure college Main Scheme)येथे दुग्धशाळा प्रक्षेत्रावर विविध कामे ठेका पद्धतीने करावयाची आहेत. तरी ठेकेदारांने कामाचे स्वरूप प्रत्यक्ष दुग्धशाळा प्रक्षेत्रावर येऊन पहाणी करावी. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ. क्र | कामाचा कालावधी | कामांचा तपशिल | आवश्यक युनिट | दर प्रती युनिट/प्रती दिन |
|---|---|---|---|---|
| १. | ०१/११/२०२२ ते ३०/११/२०२२ | १. दुभत्या गायी व म्हैशींचे सकाळ-संध्याकाळ दूध काढणे<br>२. दुधाचे सकाळ-संध्याकाळ पॅकिंग करणे<br>३. भांडारगृहातून खादय वाहतूक करणे<br>४. म्हशींना खाद्य खायला घालणे.<br>५. गायी व म्हशी धुणे, खरारा करणे व तत्संबंधी कामे करणे | कुशल मजूर ६० | |
| | | १.दुग्धशाळा प्रक्षेत्र,शिवाजीनगर प्रक्षेत्र व विद्यापीठ प्रक्षेत्र येथे हिरवी वैरण कापणे<br>२. कापलेल्या वैरणीची गठ्ठे बांधणे<br>३. वैरण ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरणे<br>४. वैरण गोठयांवर किंवा चाफ कटर शेडवर उतरवून ठेवणे<br>५. गाय-म्हैशी, वासरे, रेडके गोठयांतील शेण कंपोस्ट खड्यांवर वाहतूक करून गोठे धुणे<br>६. गाय-म्हैशी,वासरे, रेडके यांचे गोठे धुवून फिनेल टाकून साफ करणे व दूध काढते वेळी जनावरांचे शेण ओढणे<br>७.गाय-म्हैशी,वासरे,रेडके यांच्या गोठयांच्या शेजारील पेडॉकची साफ-सफाई करणे<br>८. गाय-म्हैशी,वासरे, रेडके यांच्या गोठयांतील जाळया व काचा साफ करणे व छताची स्वच्छता ठेवणे<br>९. गाय-म्हैशी,वासरे, रेडके गोठयांच्या परिसराची साफ-सफाई करून स्वच्छता ठेवणे.<br>१०.डचबार्न मधील सुकी वैरण, चॅपिंग केलेली हिरवी वैरण गोठयांवर व दोन्ही पेडॉकमध्ये वाहतूक करणे व जनावरांना घालणे<br>११. गाय-म्हैशी,वासरे, रेडके यांना योग्य वेळेत खादय घालणे<br>१२. दुग्धशाळा प्रक्षेत्र व शिवाजी नगर प्रक्षेत्रावरील लागवड केलेल्या गवत प्लॉटला दररोज पाणी देणे.<br>१३. रब्बी हंगामात चारा पिकांसाठी गवत व धसकटे वेचून लागवडी योग्य प्लॉट तयार करणे.<br>१४. रब्बी हंगामात चारा पिकांची लागवड करणे.<br>१५. विद्यापीठ प्रक्षेत्रावरून दररोज गुरे चरवून आणणे.<br>१६. प्रक्षेत्रावर पहारेकऱ्यांच्या सार्वजनिक व साप्ताहीक सुट्टीच्या काळात रात्री कामावर हजर राहणे व त्यांना नेमुन दिलेली कामे करणे<br>१७. मा. प्रमुख/ मा. दुग्धशाळा व्यवस्थापक, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग यांच्या कामाबाबतच्या सूचनेनूसार वेळोवेळी अत्यावश्यक कामे करणे | अकुशल मजूर ३०० | |
| | | एकूण युनिट | ३६० | |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटीव शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि दरपत्रक नमुना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये कामासाठी आवश्यक **३६०** युनिटच्या होणाऱ्या एकुण रकमेचा स्पष्ट उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक.२०/१०/२०२२.पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहित दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"दुग्धशाळा प्रक्षेत्रावरील कामाचा ठेका"** असा उल्लेख करावा, बंद लिफाफा **मा. प्रमुख, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविदयालय दापोली** यांचे नावे पाठवावा. पोष्टाद्वारे होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

**प्रमुख**
**पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग**
**कृषि महाविदयालय दापोली**

**प्रत:** दुग्धशाळा प्रक्षेत्र नोटिस बोर्ड, ग्रामपंचायत गिम्हवणे,ग्रामपंचायत जालगांव, नगरपंचायत दापोली, कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,डॉ.बा.सा.को.कृ.विद्यापिठ,दापोली,ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे प्रसिध्दीसाठी लावण्यात येत आहे.

• <u>पोहोच</u> •

१) दापोली नगरपंचायत, दापोली
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

२) निर्मल ग्रुप ग्रामपंचायत, गिम्हवणे
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

३) जलस्वराज्य ग्रामपंचायत, जालगाव
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

४) दुग्धशाळा प्रक्षेत्र नोटिस बोर्ड,
कृषि महाविद्यालय, दापोली

५) कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बा. सा. को. कृ. विद्यापिठ, दापोली.